# खासदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१२-२०१३ प्रशासकीय मान्यता

(मा.श्री तारीक अन्वर, खासदार राज्यसभा सदस्य यांनी प्रस्तावित केलेली कामे)

**वाचा -**

१) शा.नि.क्र.खाविनी/१०९४/प्र.क्र.१२/का-१४४५ दिनांक १७.३.९४
२) नियोजन विभागाचे पत्र क्र.खाविनी/१०९४/प्र.क्र.१२/का-१४४५ दि.१०.१२.९४
३) संचालक कार्यक्रम कार्यान्वय विभाग न्यू दिल्ली पत्र क्र.सी./८९/९९/एमपीलेड दि.१५.२.९७
४) संचालक कार्यक्रम कार्यान्वयन विभाग न्यू दिल्ली अशा.पत्र.क्र.सी./३९/२००० एमपीलेड दि.२१.२.०२

## प्रशासकीय मान्यता

आदेश क्र.जिनिस/भं/स्थाविका/का-३/प्रमा/२०१२/१२७९
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा
दिनांक :- २०/०९/२०१२

## आदेश

१) उपरोक्त शासन निर्णय क्र १ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत खासदारांचा स्थानिक विकास योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामासाठी जिल्हयाला देण्यात आलेल्या विशेष तरतूदीतून मा. खासदार यांनी सुचविलेल्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. या अधिकाराचा वापर करून या कार्यक्रमांतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये घ्यावयाच्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या नविन कामांना स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या, अंदाजपत्रकीय किंमतीला व कार्यवाही अधिकाऱ्याकडून तांत्रिक मान्यता असलेल्या कामांना खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

२) या योजनेखाली जी कामे घेण्यात येत आहेत त्या कामावर ठेकेदारांना अमानत रक्कम किंवा उचल देणे अनुज्ञेय नाही.

३) या कार्यक्रमांतर्गत कसल्याही प्रकारच्या वस्तूची खरेदी किंवा यंत्रसामुग्रीची खरेदी अथवा महसूली खर्च करण्याची परवानंगी नाही. हि कामे शक्यतोवर एक किंवा दोन कामांच्या मोसम मध्ये (वर्कींग सिजन) पूर्ण होऊन टिकाऊ स्वरूपाची मालमत्ता तयार होईल याची खबरदारी घ्यावी.

४) या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कामाबाबत कोणत्याही प्रकारे खाजगी जमिनीचा प्रश्न उदभवणार नाही व कामाच्या अंदाजपत्रकास व आराखडयास निर्देश केल्याप्रमाणे कामाची गुणवत्ता राखली जाईल याची दक्षता कार्यवाही यंत्रणेनी घ्यावी

५) या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणारी मालमत्ता ही संबंधित स्थानिक संस्था किंवा शासकीय विकास यांच्या मालकीची असते. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर कामावर होणारा देखभालीचा आवर्ती खर्च उचलणे आवश्यक आहे. पूर्ण झालेली कामे ही खासदारांच्या निधीतून निर्माण झालेली आहे. याची स्वतंत्र नोंद या मालमत्तेच्या संबंधात ठेवणे आवश्यक आहे. हे काम यापूर्वी कोणत्याही कार्यक्रमातून झालेली नसल्याचे कार्यवाही अधिकाऱ्यांनी खात्री करून घ्यावी. काम पूर्ण झाल्यानंतर खासदारांच्या विकास योजनेतील काम असा फलक लावणे आवश्यक आहे.

६) या कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेली कामे पूर्ण करण्याचा कालावधी खालीलप्रमाणे असेल. या कालावधीत काम पूर्ण झाले नाही तर, संबंधित यंत्रणेविरूध्द प्रस्तावित कार्यपध्दतीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

१) अंदाजपत्रकीय किंमत ५,००,०००/- रूपयापर्यंत ------------------------ ६ महिने
२) अंदाजपत्रकीय किंमत ५,००,०००/- रूपये ते १०,००,०००/रूपयापर्यंत -------९ महिने
३) अंदाजपत्रकीय किंमत १०,००,०००/- रूपयाचे वर -------------------------१ वर्ष

७) काम पूर्ण झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणांनी हे काम संबंधित विभागाकडे सुपूर्त करावे. व त्याचे प्रमाणपत्र घेवून त्याची प्रत या कार्यालयाकडे सादर करावी. ही काम जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांच्या निरीक्षणासाठी आवश्यक तपशिल उपलब्ध करून द्यावा.

८)    या कार्यालयाव्दारे खालीलप्रमाणे तरतूद करण्यांत येत असून प्रत्यक्ष निधीचे वितरण स्वतंत्र आदेशाव्दारे करण्यांत येईल.

| अ क्र. | योजना कार्यान्वीत करणारे अधिकारी | परिशिष्ट - अ मधील प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामाची संख्या | अंदाजपत्रकीय किंमत | प्रशासकीय मान्यता किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जि. प., भंडारा** | १ | ४.९९ | ४.९९ |
| | **एकूण -** | १ | ४.९९ | ४.९९ |
| | एमपीएलएडी आकस्मीक खर्च (अंदाजपत्रकीय किमतीच्याअर्धा टक्के) | | | ०.०० |
| | **एकूण -** | १ | ४.९९ | ४.९९ |

९)    या कार्यक्रमाअंतर्गत हाती घेतलेली कामे पूर्ण झाल्यानंतर हि संबंधित अभिकरणाकडे परिरक्षण व देखभालीसाठी हस्तांतरीत करावी.

१०)    या कार्यक्रमाअंतर्गत कामास कार्यवाही यंत्रणेने दिलेल्या तांत्रिक मान्यतेचे अधिन राहून प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यांत येत आहे. तांत्रिक बाबी संबंधिची सर्व जबाबदारी संबंधीत तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या यंत्रणेवर राहील.

११)    या कार्यक्रमातील कामावर होणारा खर्चाचा हिशेब स्वतंत्रपणे नोंदवहीत ठेवण्यांत यावा व महालेखापाल यांच्या निरिक्षणाच्यावेळी नोंदवही उपलब्ध करून दयावे. खर्चाच्या निधीच्या हिशेबासाठी रोजगार हमी योजनेत ज्या लेखा पध्दतीची उपयोग करण्यांत येतो त्या पध्दतीचाच उपयोग या कार्यक्रमातील निधी वर्ष अखेर न संपणारा ( नॉन लॅप्सेबल) आहे. त्यामुळे कार्यवाही अधिकाऱ्यांनी वर्ष अखेर शिल्लक निधी कोषागारात जमा करू नये. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर निधी शिल्लक राहील्यास तो या कार्यालयास चेकने/बँक ड्राप्टने तपशिलासह जमा करावा.

१२)    या कार्यक्रमावर झालेल्या खर्चासह मासिक प्रगती अहवाल दर महिण्याच्या ७ तारखेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.

-स्वा-
जिल्हाधिकारी, भंडारा

प्रतिलिपी - माहितीकरीता सादर

११) मा.आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

१२) महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर

प्रतिलिपी - माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रषित.

१३) कार्यकारी अभियंता, सा.बा. (राज्य),भंडारा

१४)कार्य.अभियंता, (बांधकाम/ग्रा.पा.पु./ल.पा.) जि.प. भंडारा

१५)--------------------------------------------------

(योजना कार्यान्वीत अधिकारी)

-स्वा-
जिल्हाधिकारी, भंडारा.

**खासदारांचा स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम २०१२-१३**
**मा.श्री तारीक अन्वर, खासदार राज्यसभा सदस्य यांनी प्रस्तावित केलेली कामे**
**प्रशासकीय मान्यता**

क्र.जिनिस/भं/स्थाविका/का-३/प्रमा/२०१२/१२७९
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा
दिनांक :- २०/०९/२०१२

**परिशिष्ट - 'अ'** (रू. लाखात)

| अ. क्र. | कामाचे नाव | तांत्रिक मान्यतेचे विवरण | अंदाजपत्रकीय किंमत | प्रशासकीय मान्यता किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **कार्यकारी अभियंता, सा. बा. जि.प., भंडारा** | | | | |
| १. | मौजा खापा ता. तुमसर येथे वच्छला काळे यांचे घरापासून ते जगदिश हलमारे यांचे घरापर्यंत सिमेंट कांक्रीट रस्ता बांधकाम | ता.मा.क्र.२६७/१२ दि. ३.९.२०१२ | ४.९९ | ४.९९ |
| **एकूण १ काम** | | | ४.९९ | ४.९९ |
| एमपीएलएडी आकस्मिक खर्च (अर्धा टक्का) | | | | ०.०० |
| **एकूण १ काम** | | | ४.९९ | ४.९९ |

-स्वा-
**जिल्हाधिकारी, भंडारा**

प्रतिलिपी - मा. श्री तारीक अन्वर, राज्यसभा सदस्य, १० डॉ. बिशंभर दास मार्ग, नवी दिल्ली ११० ००१ यांना माहितीस्तव सादर.

-स्वा-
**जिल्हाधिकारी, भंडारा.**